Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX | ISSUE- I | JANUARY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास

स्वाती साबणे
डॉ.विद्यानंद खंडागळे

*सध्याच्या विज्ञान युगामध्ये नवनवीन शोध लागत आहेत. विविध विषयांमध्ये संशोधने होत आहेत . यामुळे प्रत्येक विषयाची खोली / ज्ञानाची कक्षाही रुंदावत आहे. विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाबरोबरच व्यवस्थापन या विषयालाही खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. आज प्रत्येक गोष्टीतील गुणवत्ता , उत्कृष्टता ही केवळ संसाधने व मनुष्यबळावरच आधारित नसून त्याचे व्यवस्थापन करणे ही तितकेच महत्त्वाचे आहे .*

*आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये ज्ञानाच्या क्षेत्रातील ही स्पर्धा निर्माण झाल्यामुळे प्रत्येक शाळा आपले अस्तित्व टिकविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहे . यासाठी त्यांना कुशल मनुष्यबळ व इतर संसाधनांबरोबरच उत्कृष्ट व्यवस्थापनाचीही गरज पडत आहे .*

*सदरच्या संशोधनामध्ये कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे , माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांचे निकष ठरविणे , गुणवत्तापूर्ण शाळांचे शालानिहाय विविध निकषांच्या आधारे व्यवस्थापन प्रक्रियेचा शोध घेणे ही उद्दिष्टे मांडण्यात आली व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे . तसेच माहिती संकलना करीता पदनिश्चयन श्रेणीचा वापर करण्यात आला . नमुना निवड करत असताना संशोधकांनी कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील १० माध्यमिक शाळांची निवड करून ९ वी व १० वीच्या वर्गास अध्यापन करणाऱ्या प्रत्येकी १० शिक्षकांची प्रासंगिक नमुना निवड पद्धतीने केली आहे . सदर संशोधनामध्ये संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला . संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन विविध निकषांच्या आधारे करण्यात आले त्यानुसार आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे*

*संशोधिकेने ठरविलेल्या विविध निकषांच्या आधारे आलेले निष्कर्ष शिक्षकांनी अवबोधित केलेल्या व्यवस्थापकीय गुणवत्तेच्यादृष्टीने व शालेयदृष्टीने गुणवत्ता ही निवडण्यात आलेल्या सर्वच शाळांमध्ये आढळून आली .*

-

**प्रस्तावना**

प्रत्येक विद्यार्थ्याचे जसे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते व तेथे व्यक्तिभेद आढळतात त्याचप्रमाणे प्रत्येक शाळेला स्वतःचे व्यक्तिमत्त्व असून ते इतर शाळांपेक्षा भिन्न असते . प्रत्येक शाळेला एखाद्या कारखान्यांच्या मालिकेचे फलित मानणे यात फार मोठा धोका आहे . गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना प्रत्येक शाळेने आपल्यापाशी असणाऱ्या साधन क्षमतांचा अधिकतम उपयोग केला पाहिजे . प्रत्येक शाळेची व्यक्त व मान्यताप्राप्त गुणवत्ता असते . बऱ्याचवेळा व्यक्त गुणवत्ता हीच चुकीने प्रत्यक्ष गुणवत्तेची समतुल्य मानली जाते . व्यक्त गुणवत्तेपलीकडे प्रत्येक शाळेची एक अस्पर्शित सुप्त गुणवत्ता असते . सर्वांगीण गुणवत्ता ही व्यक्त तसेच सुप्त गुणवत्तेच्या अधिकतम विकासाची निष्पत्ती आहे . एखादी शाळा स्वतःचे गुण शोधण्यात गुंतते तेव्हा ती गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा अथवा शिक्षणातील गुणवत्तेचा दावा करू शकते . मुखोपाध्याय , मर्मर ( २००१ ) शिक्षणातील सर्वांगीण गुणवत्ता व्यवस्थापन ) अशाच काही शाळांचा प्रस्तुत संशोधनातून संशोधकांनी कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी शिक्षक या घटकाद्वारे माहिती संकलित करून संबंधित संशोधनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे .

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे .
२. कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांचे निकष ठरविणे.
३. कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांचे शालानिहाय खालील निकषांच्या आधारे व्यवस्थापन शोध घेणे .
   १. नेतृत्व व शालेय प्रशासन

२. भौतिक सोयी सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन ,
३. विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन .
४. मानव संसाधन व्यवस्थापन ,
५. आधार स्तंभांचे (पालक, देणगीदार, सामाजिक संस्था ) व्यवस्थापन. कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांना प्राप्त निकषानुसार शालानिहाय सूचना करणे .

**संशोधनाची गृहीतके**

१ ) कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील ज्या शाळा नेतृत्व व शालेय प्रशासन , मानव संसाधन व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन आणि अध्ययन संसाधने व भौतिक सोईसुविधांचे व्यवस्थापन करतात त्या शाळा गुणवत्तापूर्ण असतात .

२ ) कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील ८० % च्या वर निकाल लागणाऱ्या शाळा गुणवत्तापूर्ण असतात . संशोधनाची व्याप्ती सदर संशोधनात व्यवस्थापनामध्ये शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेय दृष्टिने गुणवत्ता व शिक्षकांनी अक्बोधित केलेली व्यवस्थापकीय दृष्ट्या गुणवत्ता या दोन भागात नेतृत्व व शालेय प्रशासन , भौतिक सोयी सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन , आधार स्तंभांचे ( पालक , देणगीदार , सामाजिक संस्था ) व्यवस्थापन इतक्याच घटकांचा समावेश व अभ्यास केलेला आहे .

**संशोधनाची परिमर्यादा व मर्यादा**

सदरचे संशोधन हे कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील मराठी माध्यमांच्या शाळांसाठी मर्यादित आहे . प्रस्तुत संशोधनात शाळेच्या गुणवत्ता व्यवस्थापनाबाबतच्या सद्य : स्थितीचा आढावा घेऊन शिक्षकांची मते घेऊन त्या आधारे काढलेल्या निष्कर्षांवर अव बोधात्मक मानसशास्त्रीयदृष्ट्या व परिस्थितीनिहाय मर्यादा आहे.

**संशोधनाची पद्धती**

प्रस्तुत संशोधनात संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संशोधिकेने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे . संशोधनाची साधने प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी व माहिती संकलनाकरिता शिक्षकांकडून माहिती संकलन करून घेण्यासाठी पदनिश्चयन श्रेणी या साधनाचा वापर केलेला आहे . सदर संशोधनासाठी नमुना निवड कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील ६८ शाळांपैकी १० माध्यमिक शाळांची निवड करून ९ वी व १० वी च्या वर्गास अध्यापन करणाऱ्या प्रत्येकी १० शिक्षकांची निवड केली .

सदर संशोधनाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता मुखोपाध्याय , मर्मर ( २००१ ) रचित गुणवत्ता व्यवस्था पदनिश्चयन श्रेणी अवलंब करण्यात आला.

**संख्याशास्त्रीय विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनात माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केलेला आहे .

**निष्कर्ष व चर्चा**

निष्कर्ष व चर्चा पुढीलप्रमाणे

कोल्हापूर शहरातील माध्यमिक स्तरावरील गुणवत्तापूर्ण शाळांना प्राप्त निकषानुसार शालानिहाय सूचना करणे .

निष्कर्ष महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल , कोल्हापूर या माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे. परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये भौतिक सोयीसुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन याबाबत कमतरता दिसून येते.त्याचप्रमाणे शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामधील विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकाबाबत कमतरता दिसून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन व विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकांबाबत जरी कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषनिहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

प्रायव्हेट हायस्कूल , खासबाग , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे . परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन याबाबत कमतरता दिसून येते. त्याचप्रमाणे शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्तामधील विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकाबाबतही कमतरता दिसून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेयदृष्टीने गुणवत्तामध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन व व्यवस्थापनामध्ये विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकाबाबतीत कमतरता दिसून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषानिहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

प्रिन्सेस पद्मराजे गर्ल्स हायस्कूल , पेटाळा , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता • व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे . परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन व शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामधील विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकांबाबत कमतरता आढळून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेयदृष्टीने गुणवत्ता व व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामध्ये विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकाबाबत कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषनिहाय शाळा . गुणवत्तापूर्ण आहे . सौ . सरस्वतीबाई म . लोहिया हायस्कूल , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे .

परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन व शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामधील भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन याबाबतीत कमतरता आढळून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेयदृष्टीने गुणवत्तामध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन व व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामध्ये भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन या घटकांबाबत कमतरता दिसून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषनिहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनि . कॉलेज , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे. परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन आणि शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामध्ये भौतिक सोयी - सुविधा व अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापनामध्ये कमतरता असलेली दिसून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेमध्ये शालेयदृष्टीने गुणवत्तामध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन व व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्तेमध्ये भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन या घटकांमध्ये जरी कमतरता असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषनिहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

प्रिन्सेस इंदूमतीदेवी हायस्कूल फॉर गर्ल्स , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभाचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे . परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन व शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता यामध्येही नेतृत्व आणि शालेय प्रशासन या घटकांमध्येच कमतरता असलेली दिसून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेयदृष्टीने गुणवत्तामध्ये व व्यवस्थापकीयदृष्टीने गुणवत्तामध्ये ही जरी नेतृत्त्व आणि शालेय प्रशासन या घटकामध्ये कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषनिहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

उषाराजे गर्ल्स हायस्कूल , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे. परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये भौतिक सोयी सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन व शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीयदृष्ट्या गुणवत्ता घटकात व्ही यामधील भौतिक सोयीयुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन याबाबतीतही येथे ही कमतरता आढळून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेय दृष्टीने गुणवत्ता व व्यवस्थापकीय दृष्ट्या गुणवत्तेमध्ये भौतिक सोयीसुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापनाचे व्यवस्थापन या घटकामध्ये जरी कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकषनिहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे.

वि . स . खांडेकर प्रशाला , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे . परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये व शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीय दृष्ट्या गुणवत्ता यामध्येही नेतृत्व व प्रशासन या घटकां बाबतीत कमतरता आढळून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेय दृष्टीने गुणवत्ता व व्यवस्थापकीय दृष्ट्या गुणवत्तेमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन या घटकामध्ये जरी कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकष निहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

तवनाप्पा पाटणे हायस्कूल , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे . परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये व शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीय दृष्ट्या गुणवत्ता यामधील विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकाबाबत कमतरता आढळून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत शालेय दृष्टीने गुणवत्ता व व्यवस्थापकीदृष्ट्या गुणवत्ता यामध्ये विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकाबाबत जरी कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकष निहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

न्यू हायस्कूल , पेटाळा , कोल्हापूर माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी गुणवत्ता व्यवस्थापनाच्या पदनिश्चयन श्रेणीमध्ये नेतृत्व आणि शालेय प्रशासन , भौतिक सोयी - सुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन , विद्यार्थी

केंद्रीत व्यवस्थापन , मानव संसाधन व्यवस्थापन आणि आधारस्तंभांचे ( पालक , सामाजिक संस्था , देणगीदार ) व्यवस्थापन या घटकांबाबत बहुतांशी नेहमीच असा प्रतिसाद दिलेला आहे. परंतु शिक्षकांनी अवबोधित केलेली शालेयदृष्टीने गुणवत्ता मध्ये भौतिक सोयीसुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन आणि शिक्षकांनी अवबोधित केलेली व्यवस्थापकीय दृष्ट्या गुणवत्ता यामधील विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकां बाबतीत कमतरता आढळून येते .

**चर्चा**

प्रस्तुत शाळेत भौतिक सोयीसुविधा आणि अध्ययन संसाधनांचे व्यवस्थापन व विद्यार्थी केंद्रित व्यवस्थापन या घटकांबाबत जरी कमतरता आढळून येत असली तरी प्रस्तुत संशोधनाच्या निकष निहाय शाळा गुणवत्तापूर्ण आहे .

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. कपोले , अ . व . पंडित , ब . (२००४ ). कृती संशोधन व नवोपक्रम . पुणे : निराली प्रकाशन .
2. करंदीकर , सुरेश ( २०० ९). शैक्षणिक मानसशास्त्र कोल्हापूर : फडके प्रकाशन .
3. घोरमोडे , के . यु ( २००८) शैक्षणिक कृती संशोधन नागपूर विद्या प्रकाशन .
4. स घोरमोडे , के.यु. व घोरमोडे , के.के . (२००८ ) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर विद्या प्रकाशन
5. डावखर , संगीता (२०११ ) . जीवन शिक्षण , पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे ,
6. डोणे , उ . म . व गायकवाड , सु . (२००६ ) . नवोपक्रम व कृती संशोधन , कोल्हापूर : मानसी प्रकाशन
7. देसाई , व लिमये , (२०१० ) . आधुनिक व्यवस्थापन पद्धती . कोल्हापूर फडके प्रकाशन .
8. पाटील , गं . व कायदे , वि . ( २००६ ) . संशोधन पद्धती . नाशिक : चैतन्य पब्लिकेशन्स ,
9. पंडित ब . बी . ( २००५ ) . शिक्षणातील संशोधन पुणे : नित्यनूतन प्रकाशन .
10. बोकील , प्र . गो . ( २०११ ) . जीवन शिक्षण पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे .
11. मराठे , का . बा . ( २००६ ) . शालेय पातळीवर गुणवत्तेचे मानांकन , महाराष्ट्र एज्युकेशनल जर्नल , पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ ,
12. मुखोपाध्याय , मर्मर ( २००१ ) शिक्षणातील सर्वांगिण गुणवत्ता व्यवस्थापन . पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ .
13. मुरकुटे , सं . नि . ( २०११ ) . जीवन शिक्षण पुणे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे . मुळे ,
14. रा . शं . व उमाठे , वि . तु . ( १ ९९ ८ ) . शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे . नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ .
15. लीला , पाटील . ( २००७ ) . शिक्षणातील गुणवत्ता व्यवस्थापन संकल्पना शिक्षण संक्रमण , पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे .
16. लीला , पाटील . ( २००७ ) . शिक्षणातील सर्वांगीण गुणवत्ता व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता संकल्पना , शिक्षण संक्रमण , पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे ,
17. सोहनी , शं . कृ . ( १ ९९ २ ) . शैक्षणिक टीपाकोश, पुणे , हिंदुस्तान प्रकाशन
18. Best , J. W. & Kahn . J. V. ( 1982 ) . Research in Education . New Delhi Practice hall publications .
19. Buch , M. B. & Gowida , R. ( 78-83 ) . ER in India Overview .
20. Danlevi , Carol - An shells ( 2011 ) . Mobility of Assistant Principal's Examining their Roles , Accomplishments and Aspirations ( ED 517723 )
21. Retrived 17 September 2011 from . http://www.proquest.com/en-us/products/ disseratation / individuals.shtml .
22. Ronald , Barbara ( 2011 ) . The enfluence of High stakes Testing & Test preparation on High Schools student's perspectives on Education & Life long learning ( ED 523036 )

23. Retrived 7 Sep. 2011 from , http : // www.proquest.com/en-us/products/dissertations/indivisuals.shtml .
24. Tylor & Francis , ( 2010 ) . School Effectiveness & school Improvement
25. Retrived 21 Sep 2011 from , www.tandf.co.uk/journals/titles/09243453.asp

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com